लोकमत

# फिनोलेक्स, मुकुल माधव फाउंडेशनतर्फे 'कृषी'च्या ५९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** कृषी क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशनच्यावतीने शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्यात नुकताच याबाबतचा सामंजस्य करार झाला.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथा, संचालक डॉ. ए. एल. फरांदे, पुण्यातील कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कंपनी सेक्रेटरी देवांग त्रिवेदी यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

कृषी विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्या एकूण ५९ गरजू विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळणार असून, त्यामध्ये पदवीसाठी ३६, पदव्युत्तर पदवीसाठी २०, तर पीएचडी करणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना दरवर्षी ही शिष्यवृत्ती मिळणार आहे. विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रासाठी प्रोत्साहन मिळण्यासह त्यातील कौशल्य प्राप्त करण्यास हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. 'फिनोलेक्स'कडून गेल्या आठ वर्षांपासून महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना सन्मानित केले जात आहे.